तरुण भारत ■ गुरुवार ७ जानेवारी २०१६

# अंधत्वावर मात करण्यासाठी नॅबची स्थापना

## राष्ट्रीय अंध संघटनेचे संचालक डॉ. एम. बी. डोंगरे: नॅब ही देशातील अंध लोकांचा श्वास

प्रतिनिधी

कोल्हापूर

नॅशनल असोशिएशन ऑफ ब्लाईड (नॅब) ही संस्था समाजातील अंध लोकांचे पुनर्वसन करते. त्यामुळे नॅब ही संस्था अंध लोकांचे श्वास बनली आहे. नॅबची स्थापना १९५१ ला झाली. याचे कारण भारतात अंधत्वाचे प्रमाण जास्त होते. या अंधत्वावर मात करण्यासाठी या संस्थेची स्थापना करण्यात आली, असे मत नॅबचे संचालक डॉ. एम. बी. डोंगरे यांनी व्यक्त केले.

लुई ब्रेल यांच्या स्मृती दिनाचे औचित्य साधून '२१ व्या शतकात माहिती तंत्रज्ञानाचे ज्ञान अंधांना मिळावे यासाठी बॅ. बाळासाहेब खर्डेकर वाचनालयातर्फे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

नॅबचे संचालक डॉ. एम. बी. डोंगरे म्हणाले, डॉ. अलपाईनवाला, डॉ. व्हॉस, डॉ. मर्चंड यांच्या सहकार्याने वरळी येथे नॅबला जागा मिळाली. नॅबने भारतात ५३ लाख रूपयांची ब्रेल लिपीची पुस्तके उपलब्ध करून दिली आहेत. या संस्थेत अंध बांधवांना विविध सेवा पुरवल्या जातात. इतर राज्याप्रमाणे महाराष्ट्राने अंधत्व निवारण्यासाठी प्रयत्न चालू केले आहेत. निवळ सरकारवर अवलंबून न राहता एनजीओ अंधासाठी मदत करतात. ३ हजार अंधांची नोंदणी नॅबकडे उपलब्ध आहे. एका क्लिकवर नॅबमध्ये नोंदीत सर्व अंधांची माहिती मिळते. नॅबकडून समाजातील अंधांचे पुनर्वसन केले जाते. त्यामुळे नॅब हे देशातील अंध लोकांचा श्वास आहे. या संस्थेच्या माध्यमातून अंधांना शिक्षण घेता येते. तसेच शिक्षणाबाबत जनजागृती निर्माण केली जाते. महिलांसाठी नॅबने शालेय शिक्षणाचे महत्व सांगितले आहे. शिक्षणामुळे अंधांचे जीवन सुखकर होते. अंध मुली शिक्षणात आल्या पाहिजेत यासाठी नॅब प्रयत्नशील आहे. अगामी काळात २५ मुली पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतील, असे प्रयत्न करीत आहे. विविध ठिकाणी मुल कामाला आहेत.

अध्यक्षीय भाषणात बीसीयुडीचे संचालक डॉ. डी. आर मोरे म्हणाले, नॅबही संस्था अंधांच्या पुनर्वसनासाठी काम करते. १९८६ च्या शैक्षणिक धोरणात अमूलाग्र बदल झाले. शाम पित्रोदा यांच्या सहकार्याने राजू गांधी यांनी आयसीटी क्षेत्रात क्रांती केली.

प्रस्तावना डॉ. नमिता खोत यांनी केले. यावेळी डॉ. एम. एस. वासवानी यांनी अंध विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले. यावेळी प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील बॅ. बाळासाहेब खर्डेकर वाचनालयातर्फे आयोजित व्याख्यानात बोलताना नॅबचे संचालक डॉ. एम. बी. डोंगरे. सोबत डॉ. नमिता खोत, बीसीयुडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे.**